# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - ३०२३३४७६, २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स - २२६९०००७.

Email : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :www.dtemaharashtra.gov.in


ईमेलव्दारे

क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१९/३६
दिनांक : १८/१/२०१९

प्रति,

१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

**विषय :- विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयांमध्ये जागृती मंचाची स्थापना करण्याबाबत.**

**संदर्भ : उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०१९/सं.क्र.५८/१९/ तांशि-१, दिनांक १६.१.२०१९**

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भांकित शासन पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यामध्ये शासन पत्रासोबत जोडण्यात आलेल्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ८.१.२०१९ च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे मतदार जागृती मंचाची स्थापना करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत आपल्या स्तरावरून सूचना देण्यात याव्यात.

( प्रमोद नाईक )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

शिक्षण / प्रोग्राम
18.1.19

298 दिनांक 21.1.19

<u>महाराष्ट्र शासन</u>

क्र. :- संकीर्ण-२०१९/सं.क्र.५८/१९/तांशि-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
दालन क्र. ४४१, ४ था मजला,
विस्तार इमारत,मंत्रालय,
मादाम कामा रोड,मुंबई-३२
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९३१६५
दि. १६ जानेवारी, २०१९.

प्रति,
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य
मुंबई - ४००००१.

**विषय:** विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयांमध्ये जागृती मंचाची स्थापना करण्याबाबत.

**संदर्भ:** शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.९४/आस्था-२, दि.११.०१.२०१९ व त्यासोबतचे सामान्य प्रशासन विभागाचे पत्र दि.०८.०१.२०१९

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्रांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

२. सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे मतदार जागृती मंचाची स्थापना करण्याची आवश्यक ती कार्यवाही संचालनालय स्तरावर करण्यात यावी व आपल्या अधिपत्याखालील आस्थापना प्रमुखांना तशा सूचना प्रसृत कराव्यात.

**सहपत्र:** <u>वरीलप्रमाणे</u>.

(समीर ढेरे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

आवक क्र. १८६ (५)
दिनांक १७/१/१९
२६

२६ ।

पु.ह/तीशी-१
दि. १५/०१/१९

# महाराष्ट्र शासन

तात्काळ

१७५
१५/०१

क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१४/आस्था-२
४३१ विस्तार, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२
दिनांक: ११.०१.२०१९
दूरध्वनी क्र.०२२-२२८५५७६६

प्रति,

सर्व सह सचिव/उपसचिव

संचालक,
उच्च शिक्षण/तंत्र/कला/ग्रंथ संचालनालय,
मुंबई/पुणे.

विषय : विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयांमध्ये जागृती मंचाची स्थापना करण्याबाबत.

उपरोक्त विषयांचे सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ०४ जानेवारी, २०१९चे कार्यालयीन आदेश कृपया पहावेत. (प्रत सोबत जोडली आहे.)

सदर पत्रात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांना अवगत करावे.

सहपत्र: वरीलप्रमाणे.

द.रा.कहार
(द.रा. कहार)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

3595816

१|५


दिनेश कुमार जैन
मुख्य सचिव


क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र. क्र.१३५/१८/३३
**सामान्य प्रशासन विभाग**
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक - ८ जानेवारी, २०१९.

प्रिय

भारत निवडणूक आयोगाने सन २००९ पासून निवडणूक प्रक्रियेत लोकांचा सहभाग वाढविण्यासाठी Systematic Voters Education and Electoral Participation (SVEEP) हा प्रमुख कार्यक्रम निरंतरपणे राबविला आहे. मागील निवडणूकीत मतदानाच्या वाढलेल्या टक्केवारीतून त्याचे फलित दिसून आले आहे. असे असले तरी, शहरी तसेच शिक्षित मतदार या कार्यक्रमापासून दूर राहिल्याचे दिसून येते. यास्तव शहरी तसेच शिक्षित मतदारांमध्ये जागृतीसाठी शासकीय कार्यालये व इतर संस्था महत्वाची भूमिका पार पाडतील, असे निवडणूक आयोगाचे मत आहे.

निवडणूक आयोगाने मतदार जागृतीसाठी विविध शासकीय विभाग तसेच स्वयंसेवी संस्था (NGO), महामंडळे तसेच अन्य संस्थांमध्ये **मतदार जागृती मंच** (Voters Awareness Forums) स्थापन करण्याचे ठरविले आहे. निवडणूक जागृती मंचाचा उद्देश मतदार नोंदणी; निवडणूक प्रक्रिया तसेच मतदारांमध्ये मताच्या हक्काची जाणीव करुन देण्याचा राहील. मतदार जागृती मंचाच्या कार्यक्रमांचे योग्य आयोजन केले तर शासकीय कार्यालयातील सदस्यांमध्ये मतदानाविषयी जागृती निर्माण होईल. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणूकीमध्ये मतदारांचा सहभाग वाढविण्यामध्ये मोलाचे सहकार्य होईल. म्हणून मी यासोबत मतदार निवडणूक जागृती मंच पुस्तिका आपल्या अवलोकनार्थ पाठवित आहे.

मतदार जागृती मंचाची स्थापना ही भारत निवडणूक आयोगाच्या "निवडणूक साक्षरता संघ" (Electoral Literacy Club) या महत्वाकांक्षी कार्यक्रमाचा भाग असून हा मंच शाळा, महाविद्यालय तसेच अन्य संस्थांमध्ये निवडणूक साक्षरतेची भूमिका पार पाडणार असल्यामुळे भारत निवडणूक आयोग माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे यामधील मतदारांमध्ये मतदान जागृतीसाठी "निवडणूक साक्षरता संघ" तसेच औपचारीक शिक्षण व्यवस्थेबाहेरील समुदायातील लोकांमध्ये मतदान जागृतीसाठी 'चुनाव पाठशाला' स्थापन करण्यास निवडणूक आयोग सातत्याने प्रोत्साहन देत आहे.

मतदार जागृती मंचाचे शासनाच्या सर्व विभागांमध्ये आयोजन करणे सुलभ व्हावे याकरिता सर्व विभागांमध्ये उप सचिव पदापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या प्रत्येकी एका

DS/B

अधिकाऱ्याची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी व त्यांचे नाव कृपया कोणत्याही परिस्थितीत दि. १०.०१.२०१९ रोजी पर्यंत मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांना ceo_maharashtra@eci.gov.in या ईमेल वर पाठविण्यात यावे.

तसेच, आपल्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयांमध्ये देखील वरीलप्रमाणे मतदार जागृती मंचाची स्थापना करण्याकरीता सर्व संबंधित आस्थापना प्रमुखांना आपल्या स्तरावरुन तातडीने सूचना देण्यात याव्यात, अशी विनंती आहे.

आपला स्नेहांकित,

दिनेश कुमार जैन

( दिनेश कुमार जैन )

सहपत्र: मतदार जागरुकता मंच पुस्तिका

**सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव**
मंत्रालय, मुंबई.